**Bachelor of Arts (Rural Services) Semester—IV Examination**

**MARATHI LITERATURE**

**Paper—8**

Time : Three Hours] [Maximum Marks : 80

**सूचना** :—(1) **पाचही** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. मराठी काव्याची संकल्पना स्पष्ट करून काव्याचे स्वरूप वैशिष्टये विशद करा.

**किंवा**

'क्रांतीचा जयजयकार' या कवितेचे रसग्रहण करा.

2. मराठी कवितेच्या विविध घटकांचा परिचय करून द्या.

**किंवा**

कुसुमाग्रजांच्या प्रेमविषयक कवितांचे स्वरूप विशद करा.

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील वाक्यांचे संदर्भासह अर्थ स्पष्ट करा :—

**गट 'अ'**

(ए) ज्योतीतुनि धावत या तेज:कण सारे
या यज्ञातील अन् सरणातील निखारे
रे ढाळ नभा, तव त ज्वालामय तारे
पेटवु द्या वणवा कणाकणात मशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली !

(बी) नको ग नको ग
आक्रंदे जमीन
जाळीत जाऊ तू
बेहोष होऊन.

(सी) पाचोळयापरि पडली पाहुन प्रेतांची रास
नयन झाकले असशिल देवा, तू अपुले खास;
असेल ही वा सैतानाची प्रभूवरी मात
एक जखम अन् नवीन येशू, तुझ्या काळजात !

(डी) जीवनावाचून
जळला अंकुर
प्रश्नही राहिला
राहिले उत्तर

**किंवा**

गट 'ब'

(ई) कोट्यवधी जगतात जिवाणू जगती अन् मरती
जशी ती गवताची पाती,
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली
निर्मितो नव क्षितिजे पुढती !

(एफ) परी भव्य ते तेज पाहून पूजून
घेऊ गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे !

(जी) स्वप्नांचा वा खजिना घेउनि लगबगिने रात्र
गेली, चुकोनिया मात्र
उषास्वप्न हे उरले मागे—तुजसाठी रमणी
झाला उष:काल राणी।

(एच) शब्द-जीवनाची अपत्ये-
मृत्पूपर्यंत पोहोचत नाहीत
म्हणून तुझ्या समाधीवर
भी वाहात आहे
माझे मौन.

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :—

गट 'क'

(ए) प्रतिभेची ठळक कार्ये सांगा.

(बी) भावनात्मकता म्हणजे काय ?

(सी) अभिधा या शब्दशक्तीचे स्वरूप स्पष्ट करा.

(डी) गौणी लक्षणेचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

गट 'ड'

(ई) 'स्फूर्ती' म्हणजे काय ?

(एफ) कल्पनाशक्तीचे महत्व सांगा.

(जी) 'संकेतितार्थ' म्हणजे काय ?

(एच) लक्ष्यार्थाचा मुख्यार्थाशी असणारा संबंध विशद करा.

5. खालील प्रश्नांची प्रत्येकी **दोन** ते **तीन** ओळीत उत्तरे लिहा :—

(ए) कुसुमाग्रजांच्या कोणत्याही दोन सामाजिक कवितांची नावे सांगा.

(बी) 'सात' या कवितेत कोणत्या प्रसंगाचे वर्णन आले आहे ?

(सी) 'विराट वड' ही कविता कशाचे प्रतीक आहे ?

(डी) 'रसयात्रा' या काव्यसंग्रहाचे संपादक कोण ?

(ई) जगन्नाथ पंडिताचे प्रतिभेविषयीचे मत सांगा.

(एफ) प्रतिभेच्या 'स्मरण' या अंगाचे महत्त्व सांगा.

(जी) शब्दांच्या शक्ती किती व कोणत्या ?

(एच) वाचक शब्द म्हणजे काय ?